# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक २०.५.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

(प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक १२ :-** अमरावती स्थित मौजे नवसारी सर्व्हे क्रमांक २९ भाग मधील क्षेत्र ०.४२ हे. आर जागा रहिवाशी वापर क्षेत्रातुन वगळुन मनपा झोन कार्यालयाच्या इमारती करीता सार्वजनिक निम सार्वजनिक वापर क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे बाबत.

**ठराव क्रमांक १२ :-**

अमरावती स्थित मौजे नवसारी सर्व्हे क्रमांक २९ भाग मधील क्षेत्र ०.४२ हे. आर जागा ही शासकीय मालकीची आहे. अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु.) नुसार सदर्हु जागे मधून वि. यो. १८.०० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित असुन उर्वरित क्षेत्र रहिवाशी क्षेत्रात दर्शविलेले आहे. सदर जागेवर महानगरपालिका प्रशासना मार्फत मनपा झोन क्रमांक १ कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करावयाचे आहे. करीता सदर जागा रहिवाशी वापर क्षेत्रातुन वगळुन मनपाची झोन कार्यालयाची इमारत करीता सार्वजनिक निम. सार्वजनिक वापर क्षेत्रात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समिती मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु, सद्यस्थितीत शहर सुधार समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार नागरिकांचे हरकती व सुचना नोंदवुन त्याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन अंतिम ठराव पुन्हा मान्यते करीता नियोजन प्राधिकरणाकडे न पाठवता सरळ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रशासकीय विषयास मा. आयुक्त यांनी दिनांक १८.०५.२०२२ रोजी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार सदर्हु प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती

स्वा/-
प्रशासक,
महानगरपालिका,अमरावती

नगर सचिव
अमरावती महानगरपालिका,
अमरावती